दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०३/२०२० मधील नि. १० वरील आदेश
{जयराम धुरी व. ३ –अर्जदार वि. कमलाकर सावंत वगैरे –प्रतिवादी }

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. सदरचा अर्ज सामनेवाला यांनी त्यांनी मुळ अर्जावर म्हणणे न दिल्याने अर्ज पुढील आदेशावर नेमण्यात आला आहे. तरी त्यांचे म्हणणे दाखल करुन घेण्यासाठी दाखल केला आहे. सामनेवाला यांचे म्हणणे की, कोव्हीडच्या प्रादुर्भावामुळे त्यांना आवश्यक ती कागदपत्रे व माहिती वेळेत मिळू शकली नाही. त्यामुळे त्यांना म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. म्हणणे वेळेत दाखल न करण्यामागे त्यांचा कोणताही गैरहेतु नव्हता. त्यांचे म्हणणे दाखल करुन न घेतल्यास त्यांच्यावर अन्याय होणार आहे. तरी अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती सामनेवालातर्फे करण्यात आली आहे.

२. अर्जदार यांनी अर्जावरच म्हणणे दाखल केले असून त्यांच्या म्हणण्यानुसार सामनेवाला हे अर्जाचे कामी हजर झाले आहेत. त्यामुळे त्यांना अर्जाची माहिती होती. मे. न्यायालयाने त्यांना म्हणणे देण्यास बरीच मुदत दिली होती. तरी देखील सदर कालावधीमध्ये सामनेवाला यांनी म्हणणे दिलेले नाही. अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक नाही. तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा अर्ज अर्जदार यांनी सामनेवाला यांनी मे. न्यायालयाने रे. दि. मु. नं. ६६/२०१८ मध्ये दिलेल्या आदेशाचा भंग केल्याने त्यांना तुरुंगात टाकण्यात यावे व त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करावी यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षामधील खराखुरा वाद निर्णित

करणेसाठी सामनेवाला यांचे म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सामनेवाला यांचे म्हणणे दाखल करुन घेतल्यास अर्जदार यांचे काही नुकसान होणार नाही. परंतु सामनेवाला यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केल्यामुळे त्यांचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सामनेवाला यांनी अर्जदार यांना रक्कम रुपये १००/- (रुपये शंभर मात्र ) इतका खर्च देणेचे अटीवर सामनेवाला यांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांनी खर्चाची रक्कम अर्जदार यांना दिल्यानंतर त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

सही/-

(अ. जो.बाचुळकर)

ठिकाण : कुडाळ.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दि.१८/०४/२०२२

कुडाळ.